## प्रकरण दुसरे

# वाकाटकांचा राजकीय इतिहास

दक्षिण भारतात अनेक राजघराणी होऊन गेली. त्यापैकीच एक वाकाटक घराणे होय. या राजघराण्याची राजधानी विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील रामटेकजवळील नंदिवर्धन होती. या राजघराण्याने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत म्हणजेच ३०० वर्षे दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटकांच्या दोन शाखा अस्तित्वात होत्या. नंदिवर्धन ही जेष्ठ शाखा होती तसेच वत्सगुल्म ही कनिष्ठ शाखा होती. वत्सगुल्म शाखेने संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. वाकाटकांचे सांस्कृतिक योगदानही फार मोठे आहे. गुप्त राजवंश आणि वाकाटक राजवंश हे समकालीन होते. गुप्त राजवंशाने उत्तर भारतात व वाकाटक राजवंशाने दक्षिण भारतात राज्य केले. सातवाहन घराण्यानंतर वाकाटकांची दक्षिण भारतात सत्ता उदयास आली.

सातवाहनानंतर मराठवाड्यावर वाकाटक घराण्यांने राज्य केले. भारताच्या इतिहासांत उत्तर भारताचा किंवा दक्षिण भारताचा इतिहास असा काही प्रकार अस्तित्वात नाही. भारताचा इतिहास हा सर्वसमावेशक दक्षिण - उत्तर पूर्व - पश्चिम असाच आहे. परंतु सर्वच पाश्चात्य आणि भारतीय अभ्यासकांचे लक्ष उत्तर भारतातील प्रमुख राजकीय घडामोडीवरच केंद्रीत झालेले होते. प्राचीन भारतातील राजकारणाच्या ध्रुवीकरणाची प्रक्रिया ही मगध परीसरांत घडून आली. नंद - मौर्य - साम्राज्य याच परिसरांत उदयास आले. शुंग कण्वाची सत्ता स्पर्धा उत्तर भारतातच घडून आली. पल्लव व कुशाणांची आक्रमणेही याच उत्तर भारतीय परिसरातच झाली. येथेच कनिष्काचे राज्य अस्तित्वात आले व चौथी बौध्द धर्म परीषद भरली. गुप्त साम्राज्यही याच भागांत उदयास आले व भारताचे सुवर्णयुगही येथेच अवतरले होते. नंदमौर्य साम्राज्य उदयापासूनच नव्हे तर हडाप्पा मोहंजोदाडोच्या सिंधू संस्कृतीपासूनचा सर्व इतिहास हा प्रामुख्याने नर्मदा नदीच्या उत्तरेला विंध्यपर्वताच्या पलिकडेच घडला. साहजिकच भारतीय इतिहासाच्या संशोधनाचे लक्षही सुरुवातीला उत्तर भारतावरच केंद्रीत झाले होते.

याचा अर्थ असा नव्हे की विंध्य पर्वताच्या दक्षिणेला नर्मदा नदीच्या परिसरांतील म्हणजे दक्षिणतीराकडील प्रदेशांत काहीच घडले नाही. तर गेल्या काही दशकातील इतिहास संशोधनानी दक्षिण भारतीय इतिहासातील अनेक गोष्टी प्रकाशात आल्या आहेत. बौध्द कालखंडात अश्मक व मुलकांची जनपदे याच दक्षिण भारतात म्हणजेच मराठवाड्यात घडून आली. सम्राट अशोकाच्या काळातील पितनिकांचे राज्य औरंगाबाद जिल्ह्यातील पितळखोऱ्याच्या परिसरात होते हेही स्पष्ट झ-ााले आहे. नंदाचे राज्य नर्मदेखाली अगदी नांदेडपर्यंत पसरले होते ; ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे.

मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर प्राचीन भारतीय सत्तेचा केंद्र बिंदु उत्तर भारतातून मगध परिसरांतून केंद्रीत होऊन पुढे तो विंध्य पर्वत ओलांडून नर्मदापार करुन दक्षिण भारतात म्हणजे मराठवाड्यात पैठण परिसरात स्थिरावला. पैठणची सातवाहन सत्ता ही इतर प्राचीन भारतीय सत्तेपक्षा सामर्थ्यवान सत्ता होती. या काळातील प्रमुख बाजारपेठात मराठवाड्यातील ( तगर ) तेर, प्रतिष्ठान, भोगवर्धन ( भोकरदन ) यांचा समावेश होता. सातवाहनांची सत्ता दक्षिणेत आंध्रप्रदेशात होती. त्यांनी शकांना पराभूत करुन उत्तरेतील त्यांची आक्रमणे थोपवली होती. या काळात उत्तर भारतात प्रचंड राजकीय अनागोंदी कारभार असला तरी मराठवाड्यात सातवाहनांचे समर्थ आणि वैभवशाली राज्य अस्तित्वात होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर पासून रोम पर्यंत व्यापार भरभराटीला आलेला होता. औरंगाबाद जिल्ह्यातील भोगवर्धनचे व्यापारी सांचीच्या स्तूपाला देणगी देण्याइतपत श्रीमंत होते. प्रतिष्ठान व तेर या मराठवाड्यातील बाजारपेठाही गजबजलेल्या होत्या. गुप्तकाळातच दक्षिण भारतात म्हणजे महाराष्ट्रातील विदर्भ-मराठवाडा परिसरात वाकाटकांचे राज्य उदयास आले होते. वाकाटकांचा हा काळ प्राचीन भारतीय इतिहासातील एक उल्लेखनीय कालखंड ठरतो. गेल्या शंभर - दीडशे वर्षातील इतिहास संशोधनामुळे वाकाटकांचा इतिहास आता बराच स्पष्टपणे रेखाटता येतो.

अजिंठ्याच्या लेणीतील शिलालेखातुन वाकाटकांविषयी माहिती उपलब्ध होते. पुराण ग्रंथातूनही वाकाटकांची वंशावळ आढळते. विंध्यशक्ती दुसरा ; या वाकाटक राजाचा वाशिम ताम्रपट[१] आणि प्रभावती गुप्ताचा पुणे ताम्रपट[२] हा सर्वात महत्त्वाचा असा पुरावा डॉ. मिराशी

वा.वि. यांनी खुप सविस्तरपणे संशोधिला आहे. प्रवरसेन दुसरा या वाकाटक राजांचा शिवनी ताम्रपट हाही एक दुर्मिळ साधन ठरतो. अमरावती शिलालेख उल्लेखनीय ठरतो. त्याशिवाय स्थापत्य अवेशषही मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेले आहेत. नागपूरजवळ रामटेक येथे आणि पवनार येथे महत्वपूर्ण अवशेष आढळले आहेत. नांदेड जिल्ह्यातील पैनगंगेच्या काठावरील शिऊरची लेणी ही देखील वाकाटक कालीन असल्याचे सिध्द झाले आहे. अजिंठ्याच्या लेणीपैकी लेणी क्रमांक १,२,१६,१७ आणि १९ या सर्व लेणी वाकाटक कालीन आहेत. याकाळात कला, स्थापत्य व साहित्य क्षेत्रात भरीव स्वरुपाची प्रगती झाली. त्यामुळे वाकाटकांची राजवट सुवर्णकाळ ठरली.

## २.१ वाकाटकांचे मूळस्थान कोणते ?

वाकाटक घराण्याचे मूळस्थान कोणते ? याबाबत सुरुवातीच्या काळात इतिहास संशोधकात मतभेद होते. परंतु आज ते मतभेद राहिलेले नाहीत. वाकाटक घराण्याची माहिती आपणास पुराणे आणि वाकाटकांच्या कोरीव लेखावरुन होते. वाकाटकांच्या मूळ स्थानाविषयी विभिन्न मते मांडली आहेत. डॉ. वा.वि. मिराशी यांच्या मते वाकाटक हे राजघराणे दक्षिणेतीलच होते. याउलट डॉ. के.पी. जायस्वालच्या मते वाकाटक घराणे हे उत्तरेकडील होते. पुढे पुणे या ठिकाणी मिळालेल्या प्रभावती गुप्ताच्या ताम्रपटावरुन वाकाटकांचा वंश व त्यांचा काळ याविषयी माहिती मिळते. सातवाहनाच्या अस्तानंतर महाराष्ट्राच्या पश्चिम भागात अभिरांची सत्ता निर्माण झाली होती तर विदर्भात वाकाटकांची सत्ता निर्माण झाली होती. वाकाटक राजांनी धारण केलेल्या पदव्या या दक्षिणेकडील कदंब व पल्लव राजांनी धारण केलेल्या पदव्यांसारख्याच होत्या. वाकाटक स्वत:स हरितीपुत्र म्हणवून घेत असत.[३] वाकाटक घराणे मूळ दक्षिणेकडील होते हे यावरुन सिध्द होते. तसेच अनेक विद्वानांनीसुध्दा वाकाटकांना दक्षिणेकडील असल्याचे मान्य केले आहे. डॉ. के.पी. जयस्वाल यांना मध्यप्रदेशात झांशी परिसरात वाकाटक काळातील अवशेष सापडले आहेत. ओरछा संस्थानात वाकाटक या नावाच्या परिसराचेही त्यांनी अवलोकन केले. त्यावरुन त्यांनी वाकाटक हे मूळचे ओरछा संस्थानातले असावेत असा विचार मांडला. असे असले तरी त्या भागात वाकाटकांच्या अस्तित्वाचे इतर कोणतेच पुरावे उपलब्ध झाले नाहीत. डॉ. वा.वि. मिराशी यांनी वाकाटकांच्या अस्तित्वाच्या अनेक पाऊलखुणा विदर्भ-मराठवाड्यात धुंडाळल्या नंतर डॉ. के.पी.

जयस्वालांचे मत खोडून काढले. वाकाटकांचे मूलस्थान विदर्भात रामटेक जवळ नंदिवर्धन हेच होते ही गोष्ट आता निर्विवादपणे सिध्द झाली आहे.[४] वाशिम ताम्रपटाने वाकाटकाच्या वत्सगुल्म शाखेचाही इतिहास प्रकाशात आला. महाराष्ट्रातील वाशिम जिल्हा (वत्सगुल्म ) ही वाकाटकांची राजधानी असल्याचे सिध्द झाले आहे.

## २.२ वाकाटक कोण होते :

इ.स. १८३६ मध्ये शिवनी येथे एक ताम्रपट प्राप्त झाला. या ताम्रपटावरुन प्रथम वाकाटक राजघराणे प्रकाशात आले. हा ताम्रपट द्वितीय प्रवरसेन यांच्या कारकीर्दीतील आहे. वाकाटक राजघराण्याचा संस्थापक प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख पुराणात आढळतो. परंतु त्यास पवन किंवा ग्रीक वंशातील असल्याचे समजण्यात आले. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा येथील लेणी क्रमांक १६ मध्ये एक कोरीव लेख मिळाला. या कोरीव लेखाचा अभ्यास केल्यावरही डॉ. भाऊ दाजी लाड यांनी इ.स. १८६२ मध्ये वाकाटक यांना यवन किंवा ग्रीक समजण्यात आले. परंतु अजिंठा लेणीतील कोरिवलेखात प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख द्विज असा केला आहे. वाकाटकांच्या ताम्रपटातही त्यांचे गोत्र विष्णुवृध्द असल्याचा उल्लेख केलेला आढळतो. यावरुन वाकाटक ब्राह्मण जातीय होते हे स्पष्ट होते.[५]

## २.३ प्रथम विंध्यशक्ती :

विंध्यशक्ती हा वाकाटक घराण्यातील पहिला राजा असून तो वाकाटक घराण्याचा संस्थापक मानला जातो. अजिंठा येथील लेखात विंध्यशक्तीची स्तुती केल्याचे दिसून येते. विंध्यशक्तीने अनेक लढाया जिंकून आपल्या सामर्थ्यांमध्ये भर टाकली होती. विंध्यशक्तीच्या पुरिका व चनका या दोन राजधान्यांचा उल्लेख पुराणात आहे. विंध्यशक्ती चनका या ठिकाणाहून राज्य करत असावा. परंतु याविषयी निश्चित काही सांगणे कठीण आहे. विंध्यशक्तीचा काळ इ.स. २५० ते २८० हा असावा. हरितीपुत्र विंध्यशक्ती हा वाकाटक घरांण्याचा संस्थापक राजा होय. अजिंठा शिलालेखातून वाकाटक वंशकेतू म्हणजेच त्याचा उल्लेख केला जातो. अजिंठ्याच्या लेणीलेखातून त्याचे सविस्तर वर्णन आढळते. अजिंठ्याच्या १६ व्या क्रमांकाच्या लेणीतील शिलालेखातही त्याचे नाव आढळते.

विंध्यशक्ती हा औदार्यात आणि शौर्यात अतुलनीय होता. असे त्याचे वर्णन केले जाते. इंद्रासारखा श्रेष्ठ आणि विष्णुसारखा प्रबळ असलेला विंध्यशक्ती वाकाटक घराण्याचा एक महत्त्वाचा राजा होय. अजिंठा कोरिवलेखात प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख द्विज म्हणजे ब्राह्मण आणि वाकाटकवंश या नावाने केला आहे.[६] याच कोरीवलेखात असे म्हटले आहे की त्याने मोठमोठ्या लढायांत विजय मिळवून आपले सामर्थ्य वाढविले होते. तो कुध्द झाला म्हणजे प्रत्यक्ष देवांनाही अनिवार्य होत असे, त्याच्या घोड्यांच्या टापांनी उडविलेल्या धुळीने आकाशांत सुर्य झाकून जात असे त्याच्या शौर्याने पराभूत झालेले शत्रु त्याच्या पुढे विनम्र होत. प्रथम विंध्यशक्ती याची शब्दोपाधी अजिंठा शिलालेखात उल्लेखिली नाही. त्यामुळे त्याचा राज्याभिषेक झाला नसावा असे कांही इतिहासकारांचे मत आहे. परंतु यामध्ये तथ्य आढळत नाही. वाकाटकांच्या दानपत्रात विंध्यशक्तीचा उल्लेख आढळत नाही. कारण वाकाटक साम्राज्याचा खरा संस्थापक विंध्यशक्ती नसून त्याचा पुत्र प्रवरसेन हा होता. अजिंठा कोरीवलेखात विंध्यशक्तीचाच नव्हे तर त्याच्या वंशजाच्याही बाबतीत राजवंशब्दोपाधि लावलेली आढळत नाही.

महाराष्ट्राच्या प्रारंभीच्या राजकीय काळाविषयी श्री.पु.ग.सहस्त्रबुध्दे लिहितात.

स्वतंत्र राज्य प्रस्तापित करणारे सातवाहन राजघराणे त्याला लाभले. या पहिल्या घराण्याचे
“इ.स. पुर्वी तिसऱ्या शतकात महाराष्ट्राला पृथगात्मता आली त्याचवेळी या भूमीचे राज्य साडेचारशे वर्षे टिकले. त्यानंतर पन्नास पाऊनसे वर्षे महाराष्ट्रावर आभीर, शक व कुशाणांप्रमाणेच परकीय असलेल्या जमातीचे राज्य होते. पण सुदैवाने लवकरच वाकाटक नृपती ‘विंध्यशक्ती’ याचा उदय झाला, आणि त्याच्या घराण्याने सुमारे तीनशे वर्षे महाराष्ट्रावर राज्य केले ”[७]

## प्रथम प्रवरसेन :

विंध्यशक्तीनंतर त्याचा पुत्र पहिला प्रवरसेन हा वाकाटकांचा राजा झाला. हा राजा शक्तिशाली असून याने जवळपास साठ वर्षे राज्य केले. त्याने वाकाटकांच्या राज्याचा विस्तार केला. त्याने राज्याची राजधानी पुरिका केली होती. ह्याने अनेक लढाया जिंकल्या होत्या. तसेच त्याने अग्निस्त्रोत, अप्तार्यम, वाजपेय, ज्योतिस्त्रोत, सद्यास्क, बृहस्पतीसव आणि अश्वमेध असे सात प्रकारचे यज्ञ केले होते.[८] ह्याने प्रथमच सम्राट आणि धर्ममहाराज या पदव्या धारण केल्या होत्या. कलिंग, आंध्र व कोसल या राज्यांनी पहिला प्रवरसेन याची अधिसत्ता मान्य केली असल्याचे दिसते. प्रवरसेन हा वैदिक धर्माचा अनुयायी असावा. याने भारशिवनाथ या शक्तिशाली राजाशी वैवाहिक

संबंध निर्माण केले होते. भारशिव राजा भवनाग याने आपली कन्या प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र यास दिली होती. परंतु गौतमीपुत्र हा प्रवरसेनाच्या हयातीतच मरण पावला.

पुराणातील उल्लेखानुसार विंध्यशक्ती नंतर प्रवीर नावाचा राजा सत्तेवर आला. प्रवर हा विंध्यशक्तीचा पुत्र होता व त्याने प्रवरसेन हे नाव धारण केले होते. वाकाटक घराण्याची खरी प्रतिष्ठा यानेच प्रस्थापिली. त्याने वाकाटक राज्याचा  विस्तार करुन वाकाटकांचे सामर्थ्य वाढविले व विशाल राज्य निर्माण केले. पुढे वाकाटकांचे राज्य आता साम्राज्य बनले. तत्कालीन रीतीनुसार प्रवरसेनाने आपल्या साम्राज्याला राजमान्यता मिळविण्यासाठी वैदिक परंपरेतील अश्वमेध यज्ञ केल्याची नोंद आहे. घटोत्कच लेणीतील शिलालेखात त्याने केलेल्या अध्वमेध यज्ञांचा स्पष्ट उल्लेख  आहे. या अश्वमेध यज्ञामुळे अनेक राजा महाराजानी त्यांचे मांडलीकत्व स्विकारले होते. निरनिराळ्या दिशांनी अश्वमेधाचा अश्व पाठवून, त्याने चार अश्वमेध यज्ञ केले. त्यानंतर तो सार्थपणे सम्राट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याने आपली राजधानी चनाकाहून पुरिका या राज्याच्या केंद्रस्थानी असलेल्या गावी आणली. त्याने पुरीकाच्या परिसरांतील नागराजांना पराभूत केले. त्याने आपली सत्ता नर्मदा नदी पर्यंत विस्तारली होती.

प्रवरसेनाने पश्चिमेचे महाराष्ट्र, गुजराथ, कोकण हे प्रदेश जिंकले असणे असंभवनीय आहे. कारण या प्रदेशांवर त्या काळी आभीरांचे बलाढ्य राज्य होते. मात्र दक्षिणेत उत्तर कुन्तलांतील कोल्हापूर, सातारा, सोलापूर या भागात प्रवरसेनाने आपली सत्ता पसरविली असावी. पूर्वेस दक्षिण कोसल, कलिंग व आन्ध्र या देशातील लहान लहान राजांनीही प्रवरसेनाचे वर्चस्व कबूल केले असावे.[९] पण या काळातील फारच कमी लेख उपलब्ध  झाल्याने प्रवरसेनाच्या साम्राज्याच्या निश्चित मर्यादा सांगणे कठीण झाले आहे. त्याच्या साम्राज्याच्या सीमा पुराव्याअभावी निश्चित करता येत नसल्या तरी कोसल, कलिंग व आंध्र हा संपूर्ण परिसर आणि आजचा विदर्भ, मराठवाडा त्यांच्या राज्यात समाविष्ट होता.[१०]  ६० वर्षे राज्य करणाऱ्या या प्रवरसेनाने वाकाटक साम्राज्याला खरोखर स्थैर्य प्राप्त करुन दिले.

प्रथम प्रवरसेन हा धार्मिक वृत्तीचा राजा असून वैदिक धर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याने स्वत: अनेक श्रोत याग केले. त्याच्या वंशजांच्या  बहुधा सर्व ताम्रपटात त्याने केलेल्या चार  अश्वमेधांचा

व सप्तसोम संस्थेचा उल्लेख आढळतो. पुराणांत त्याच्या वाजपेय यज्ञांचा व त्यात त्याने दिलेल्या बहुमूल्य दक्षिणांचा मुद्दा निर्देश केला आहे. या वाजपेय यज्ञांच्या अनुष्ठानानंतर त्याने सम्राट ही अत्यंत मानार्ह पदवी धारण केली.[११] उत्तर किंवा दक्षिण भारतांतील इतर कोणाही प्राचीन राजाने ही पदवी धारण केल्याचे इतिहासात नमूद नाही. पूर्वीच्या नृपतीप्रमाणे त्याने आपल्या धर्मविजयित्वाची निदर्शक अशी धर्ममहाराज ही उपाधिही धारण केली. तसेच विण्हुक्रड सातकर्णि राजाप्रमाणे तो आपणास हारीतीपूत्र म्हणवून घेई.[१२] या दोन उपाधीचा उल्लेख वाशीम ताम्रपटात आला आहे. चार अश्वमेध यज्ञ करुन प्रवरसेनाने दक्षिण भारतात आपले

सम्राट पद उद्‌घोषित केले. नंतर आपल्या सत्तेला जास्त बळकटी आणण्याकरिता राज्य स्थापन केले. त्याने उत्तर भारतातील भारशिवाशी वैवाहिक संबंध जोडला होता. भारशिव हे नागवंशी असून मूळचे विदर्भातील असावे. कारण भारनृपति भगदत्त याचा ख्रिस्तोतर द्वितीय शतकातील एक शिलालेख मध्यप्रदेशाच्या भंडारा जिल्ह्यातील पौनी गावी सापडला आहे. नंतर त्यांनी उत्तरेस स्वाऱ्या करुन तेथे आपले राज्य स्थापले असे दिसते. भारशिवांचा अधिराज ( अधिपति ) भवनाग याची तांब्याची नाणी मध्य भारतातील सुप्रसिध्द नागराजधानी पद्मावती (सध्याचे पदमपवाया) येथे सापडली आहेत.

प्रवसरसेनाचा देव नामक अत्यंत धार्मिक, विद्वान व कर्तबगार प्रधानमंत्री होता. त्याचे वर्णन घटोकत्च लेण्यातील लेखात आले आहे. त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक कृत्याच्या अनुष्ठानात गुंतले होते, असे त्यात म्हटले आहे. प्रथम प्रवसरसेनाच्या कारकीर्दीतील अनेक श्रोत यज्ञांचे अनुष्ठान या विद्वान व धर्मशील मंत्र्याच्या उपदेशानुसार झाले असावे. पहिला प्रवसरसेन याने इ.स. २८० पासून इ.स. ३४० पर्यंत राज्य केले.

प्रवसरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटकांचे प्रबल साम्राज्य दुबळे व अस्थिर बनले. पुराणांतील संदर्भानुसार प्रवसरसेनला चार पुत्र होते. त्यापैकी जेष्ठपुत्र गौतमीपुत्राचा विवाह भारशीव राजकन्येशी झाला होता. त्याच्या नावाची नाणी सापडलेली नाही. त्याचा अल्पवयात आकस्मिक मृत्यू झाला असावा. सम्राट प्रवरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटक साम्राज्याचे विघटन होऊन त्याचे तीनही पूत्र स्वतंत्रपणे राज्य करु लागले. वत्सगुल्म

( वाशिम ) व नंदीवर्धन ( रामटेक ) या ठिकाणी स्वतंत्र राज्य अस्तित्वात आली. तिसऱ्या राजपुत्रानेही आपले राज्य स्थापन केले असावे ;  परंतु त्याच्या नावाविषयी अजूनही निश्चित अशी माहीती देणारा पुरावा हाती आलेला नाही. इ.स. १९३९ साली सापडलेल्या वासिम ताम्रपटात सर्वसेन  या प्रवरसेनाच्या राजपुत्राचा उल्लेख आहे.[१३] औरंगाबाद जवळच्या अजिंठ्याच्या लेणीतील एका शिलालेखातही त्याचे नाव स्पष्टपणे आढळते. तेव्हा प्रवरसेनच्या चार पुत्रापैकी गौतमीपुत्र आणि सर्वसेन हे दोन राजपुत्र होते हे आता स्पष्ट झाले आहे. उरलेल्या राजपुत्रांविषयी अजूनही शोध घ्यावा लागेल अजिंठ्याच्या लेणीतील शिलालेखात वाकाटक वंशावळीत  ही नावे होती. परंतु ती आज स्पष्टपणे वाचता न येण्याइतपत अस्पष्ट झालेली आहेत.

पहिल्या प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र मृत्यू पावल्यामुळे त्याचा नातू रुद्रसेन पहिला हा वाकाटक वंशाचा राजा झाला. हा समुद्रगुप्तास समकालीन होता. समुद्रगुप्ताने दक्षिणेतील सर्व राज्यांना जिंकून घेऊन आपली अधिसत्ता मान्य करावयास भाग पाडले होते ; परंतु रुद्रसेनच्या राज्याला त्याने धक्का लावला नाही. यावरुन वाकाटकांच्या सामर्थ्याची कल्पना येते. गुप्तापासून रुद्रसेन याने आपले राज्य सुरक्षित ठेवले होते. अलाहाबाद प्रशस्तीमध्ये या राजाचा उल्लेख रुद्रदेव असा केल्याचा दिसतो. समुद्रगुप्ताने वाकाटकांच्या सामंत राजांचे प्रदेश मात्र जिंकून घेतले होते. रुद्रसेन पहिला याने समुद्रगुप्ताविरुध्द आठ राजांचा राज्य संघ स्थापन केला होता.  व त्या राज्यसंघाचा समुद्रगुप्ताने पराभव केला आणि त्यामुळे वाकाटकांचा मध्य भारतातील प्रभाव कमी झाला. परिणामी रुद्रसेनाचे राज्य प्रत्यक्षात उत्तर विदर्भापुरतेच मर्यादीत राहिले. प्रत्यक्षात अलाहाबादच्या स्तंभलेखात गुप्त वाकाटक संघर्षाचा आणि रुद्रसेनच्या पराभवाचा उल्लेख नाही. म्हणूनच काही इतिहासकार हा संघर्ष झालाच नाही असे मानतात. वाकाटक सत्ता मात्र बरीच सिमित झाली होती, हे ऐतिहासिक सत्य आता सर्वानीच मान्य केले आहे. रुद्रसेन पहिला याने इ.स. ३४० पासून इ.स.  ३६५ पर्यंत  राज्य केले.

### पृथ्वीसेन पहिला :

रुद्रसेन पहिला याच्या नंतर त्याचा पुत्र पृथ्वीसेन पहिला हा सत्तेवर आला. हा राजा चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या समकालीन होता. पृथ्वीसेन याने राज्याचा विस्तार केला. तसेच कुंतल हा

प्रदेश जिंकून राज्यास जोडला होता. चंद्रगुप्ताने माळवा व सौराष्ट्र येथील शक सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी वाकाटक राजा पृथ्वीसेन याची मदत घेतली होती. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावती पृथ्वीसेन पहिला याचा पुत्र रुद्रसेन दुसरा यास दिली होती. पृथ्वीसेन हा शिवोपासक असून त्याने राज्याची राजधानी नागपूरजवळच २८ मैलावर असलेल्या नंदिवर्धन या ठिकाणी नेली. पृथ्वीसेन हा शिवोपासक होता व सत्य, ऋजुत्व, कारुण्य, शौर्य, विक्रम, बुध्दिमत्व, योग्य जनाविषयी परमादर, मनोनैर्मल्य इत्यादी गुणांविषयी त्याची ख्याती होती असे समजते. याची तुलना अजातशत्रु धर्मराजाशी केली आहे व याला धर्मविजयी म्हटले आहे.[१४] त्यावरुन त्याने कधीही परराज्यापहरणाकरिता युध्द केले नव्हते असे म्हणता येते. हा पृथ्वीसेन गादीवर आला त्यावेळी वाकाटक राज्यस्थापनेपासून शंभर वर्षे झाली होती. त्याचा खजिना भरला होता व लष्कर मोठे व जय्यत तयार होते, असे वर्णन वाकाटकांच्या दानपत्रात केले आहे. उत्तरेत समुद्रगुप्त व त्याचा पुत्र द्वितीय चंद्रगुप्त यांनी चढाईचे धोरण स्वीकारुन अनेक राजांना जिंकले होते व आपल्या राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या. याच्या उलट पृथ्वीसेनाने शांततेचे धोरण स्वीकारुन प्रजेच्या कल्याणाकडे आपले सर्व लक्ष दिले. पृथ्वीसेन पहिला याने इ.स. ३६५ पासून इ.स. ३९५ पर्यंत राज्य केले.

## रुद्रसेन दुसरा :

पृथ्वीसेन पहिला यांच्यानंतर त्याचा पुत्र रुद्रसेन दुसरा हा वाकाटक वंशाच्या गादीवर आला ; परंतु याची कारकीर्द अगदी अल्पायुषी ठरली. हा चंद्रगुप्ताचा समकालीन असून त्याचा जावई होता. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावती हिचा विवाह रुद्रसेन दुसरा याच्याशी केला होता. रुद्रसेन इ.स.४०५ मध्ये मरण पावला.[१५] यास दिवाकरसेन व दामोदरसेन ही दोन मुले होती. ही मुले अज्ञान असल्यामुळे वाकाटक राज्याचा राज्यकारभार प्रभावतीने आपल्या मुलाच्या नावाने पाहण्यास सुरुवात केली. चंद्रगुप्ताने ( तिचा पती ) प्रभावतीस प्रशासनात सहकार्य करण्यासाठी काही अधिकारी पाठविले होते. रुद्रसेन दुसरा याने इ.स. ४०० पासून इ.स. ४०५ पर्यंत राज्य केले.

## प्रभावती गुप्ता :

प्रभावती गुप्ता ही गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्याची कन्या व वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा याची राणी होती. रुद्रसेन दुसरा हा अल्पावधीतच मृत्यू झाला. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले

दिवाकरसेन व दामोदरसेन हे अल्पवयीन होते. त्यामुळे प्रभावती गुप्ताने त्यांच्या नावाने राज्यकारभार पाहिला. पुणे[१६] येथे उपलब्ध झालेल्या प्रभावतीच्या ताम्रपटात तिने राज्यकारभारांत प्रत्यक्ष भाग घेतल्याचे म्हटले आहे.[१६] या ताम्रपटात दोन पत्रे असून ती संस्कृतमध्ये आहेत. दान नंदीवर्धन येथून देण्यात आले असून ताम्रपटात प्रभावती देवीचा रुद्रसेन (द्वित्तीय) ची महाराणी व युवराज दिवाकर सेन याची राजमाता म्हणून गौरव करण्यात आला आहे. यामध्ये आचार्य चनल स्वामी यांना कार्तिक शुध्द द्वादशीच्या दिवशी ४८ गुण खेडे अग्रहार म्हणून दान दिल्याची नोंद आहे. दान दिलेले खेडे सुप्रतिष्ठ आहारातील आहे. युवराज दिवाकरसेनच्या तेराव्या वर्षी हे दान दिल्याचे म्हटले आहे. आहार याचा अर्थ-जिल्हा, जिल्हयाचे ठिकाण. यावरुन वाकाटक काळात पैठण हे जिल्हयाचे केंद्र असून त्याचे धार्मिक महत्व वाढले असल्याचे स्पष्ट होते.[१७] प्रभावतीगुप्ता या सम्राज्ञीचा वाकाटकांच्या एकुण राज्यकारभारावर  खूप वचक होता. गुप्त सम्राटाचे पूर्ण सहाय्य तिला लाभले असल्याने तिने वाकाटक साम्राज्याला आर्थिक आणि राजकीय स्थैर्य प्राप्त करुन दिले. चंद्रगुप्त विक्रमादित्यानी प्रशासनात मदत करण्यासाठी काही अधिकारी प्रभावतीगुप्ताकडे पाठविले. विवाहनंतरही तिने माहेरचेच नाव उपयोजिलेले दिसते. कविकुलगुरु कालीदासही या काळात रामगिरीवर आला होता. नागपूर परिसरातील रामटेक - रामगिरी पर्वतावरुन कालीदासाने मेघदूत या काव्यांची रचना केली. प्रभावतीगुप्ताने स्वत: कला आणि साहित्याला राजाश्रय दिला.  ती स्वत: रामभक्त होती तिने रामटेक व पवनार या ठिकाणी राममंदिरे बांधली. लेणी स्थापत्याचाही विकास घडवून आणला. नांदेड जिल्ह्यातील शिऊरची लेणी याच काळात कोरविली गेली. याठिकाणी देखील रामाची अप्रतिम शिल्प आहेत. तसेच तेथे विष्णुच्या सुध्दा मूर्ती आहेत. प्रभावतीगुप्ता श्रेष्ठ प्रतिची प्रशासक होती. तिच्या विषयीचे  जसजसे पुरावे हाती येतील तसतसी अधिक माहिती उपलब्ध होईल. प्राचीन भारतातील सर्वश्रेष्ठ सम्राज्ञी म्हणून प्रभावतीगुप्ताचा उल्लेख केला  जातो. तिने सुरुवातीला दिवाकरसेनाच्या नावाने राज्यकारभार सुरु केला. दिवाकरसेनाच्या अल्पकालीन मृत्यूनंतर तिचा धाकटा मुलगा दामोदरसेन हा राज्यावर आला.

## दामोदरसेन उर्फ प्रवरसेन दुसरा :

रुद्रसेन दुसरा याचा जेष्ठ पुत्र इ.स. ४१० मध्ये मरण पावला. पुढे त्याचवर्षी रुद्रसेन दुसरा याचा कनिष्ठ पुत्र दामोदरसेन हा वाकाटक राजा झाला. राज्यरोहणाच्यावेळी त्याने प्रवरसेन दुसरा ही उपाधी धारण केली. याने प्रवरपूर या नवीन शहराची स्थापना करुन ते शहर राजधानी म्हणून घोषित केले. ( वर्धा जिल्ह्यातील पवनार ) दुसरा प्रवरसेन हा शिवोपासक होता. त्याने आईच्या आदेशावरुन सेतुबंध हे श्रीरामाच्या चरित्रावरील काव्य रचले. त्याने परमेश्वर ही पदवी धारण केली होती. कदंब राजकुमारी अजित भट्टारिका हिचा विवाह आपला पुत्र नरेंद्रसेन याच्याशी प्रवरसेन याने घडवून आणला होता. कदंबाशी वाकाटकांचे मैत्रिसंबंध प्रस्थापित झाले होते. प्रवरसेन दुसरा याचे आजपर्यंत अनेक ताम्रपट व शिलालेखही प्रकाशात आले आहेत. तो स्वत: अत्यंत उदार राजा होता. त्याची आतापर्यंत १३ दानपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्याने आपली राजधानी नंदीवर्धनाहून प्रवरपूर येथे ( पवनार जि. वर्धा ) आणली.[१८] या ठिकाणी वाकाटाककालीन अनेक अवशेष सापडले आहेत. त्याच्या कारकिर्दीत वाकाटकांचे कदंम्बाशी देखील मैत्रीचे आणि पुढे नातेसंबंध प्रस्थापित झाले. त्याने आपला राजपुत्र नरेंद्रसेन याचा विवाह कदम्ब राजकन्या अजिभट्टारिका हिच्याशी लावला.

द्वितीय प्रवरसेन हा शिवोपासक होता. भगवान शंकराच्या कृपाप्रसादाने आपणास आपल्या राज्यांत कृतयुग स्थापन करता आले असे त्याने आपल्या ताम्रपटात म्हटले आहे. हा मोठा दानशूर होता. त्याने दिलेले बारा तेरा ताम्रपट आतापर्यंत उपलब्ध झाले आहेत. वाकाटक वंशाच्याच नव्हे, तर इतर प्राचीन भारतीय वंशाच्या कोणाही राजाची इतकी दानपत्रे क्वचितच सापडली असतील. कालिदास वाकाटक दरबारी होता. त्या काळात त्याच्याशी याचा संबंध येऊन याला कवित्वाची स्फूर्ती झालेली दिसते. याच्या अनेक प्राकृत गाथा सप्तशतीत घातल्या आहेत. हा स्वत: शिवभक्त होता तरी आपल्या विष्णूपासक मातेच्या - प्रभावतीगुप्तेच्या आज्ञेवरुन याने भगवान रामचंद्राच्या चरित्रावर सेतुबंध काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचले.[१९] गादीवर आल्यावर लवकरच त्याने या काव्याच्या रचनेस आरंभ केला, असे त्या काव्याच्या पहिल्या आश्वासातील नवव्या गाथेवरुन दिसते. ते रचतांना त्याला अनेकदा अडचणी येत होत्या, अनेक चुका होत होत्या व ते काव्य पूर्ण करणे कठीण जात होते, असे त्याने स्वत:च सांगितले आहे. अशा प्रसंगी कविकुलगुरु कालिदासाचे त्याला बहुमोल साहाय्य झाले असावे. या कारणाने हे काव्य प्रवरसेनाच्या नांवावर मोडत असले तरी

ते त्याच्याकरिता विक्रमादित्याच्या आज्ञेने कालिदासाने रचले होते, अशी समजूत प्रचलित झाली. तिचा उल्लेख त्या काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या अखेरीस व रामदास नामक टीकाकाराच्या टीकेच्या आरंभीही आढळतो. राजधानी प्रवरपुराला नेल्यावर तेथे प्रवरसेनाने आपल्या मातेच्या इच्छेवरुन भगवान रामचंद्राचे उत्तुंग देवालय बांधले व त्यास सुंदर शिल्पांनी शूशोभीत केले. त्याचे काही अवशेष पवनार येथे मिळाले आहेत. दामोदरसेन याने इ.स. ४१० पासून इ.स. ४४५ पर्यंत राज्य केले.

## नरेंद्रसेन

नरेंद्रसेन हा दुसरा प्रवरसेन याचा पुत्र होता. याची पत्नी अजित भट्टारिका ही कदंबाची राजकन्या होती. याच्या कारकीर्दीत बस्तरच्या भवदत्तवर्मन या नलराजाने वाकाटकाच्या राज्यावर आक्रमण करुन नंदिवर्धन या राजधानीवर ताबा घेतला होता ; परंतु काही काळातच नल राजाचे आक्रमण नरेंद्रसेन याने परतवून लावले. हुणांच्या गुप्त साम्राज्यावर होणाऱ्या आक्रमणाचा फायदा नरेंद्रसेनाने घेतला व गुप्त साम्राज्यातील मेखल, कोशल व माळव्याचा काही प्रदेश त्याने जिंकून घेतला. मेखल, माळवा आणि माळव्याच्या राज्यकर्त्यांनी नरेंद्रसेनाचे श्रेष्ठत्व मान्य केले. नरेंद्रसेन याने इ.स. ४४५ पासून इ.स. ४७० पर्यंत राज्य केले. इ.स. ४७० मध्ये त्याचा मृत्यू झाला, आणि वाकाटकाच्या नंदिवर्धन घराण्याच्या ऱ्हासाची प्रक्रिया गतिमान सुरु झाली. पृथ्वीसेन दुसरा आणि हरीसेन हे या घराण्याचे शेवटचे राजे होते. इ.स. ५०० च्या दरम्यान नंदिवर्धनचे वाकाटक राज्य नष्ट झाले. पुढे हा परिवार वत्सगुल्मच्या राज्यात समाविष्ट झाला. नरेंद्रसेन याचा एकही लेख अद्यापी मिळाला नाही. तथापि त्याचे नाव त्याचा मुलगा द्वितीय पृथ्वीषेण याच्या बालाघाट ताम्रपटात उल्लेख आला आहे. त्याचा मांडलिक मेकल देशाधिपति भरतबल यानेहि आपल्या बम्हनी ताम्रपटात त्याचा प्रसन्न रीतीने उल्लेख केला आहे. बालाघाट ताम्रपटात म्हटले आहे की त्याने आपल्या अंगच्या गुणांनी आपल्या वंशाच्या राज्यलक्ष्मीचे अपहरण केले होते. या वर्णनावरुन त्याच्या राज्यारंभी कलह उत्पन्न झाला असावा व नरेंद्रसेनाने आपल्या वडील भावास बाजूस सारुन गादी बळकावली असावी. वाकाटक नृपति नरेंद्रसेन याने ज्या अज्झितभट्टारिका नामक कुन्तल

राजकन्येशी विवाह केला होता. ती राष्ट्रकूटवंशी देवराजाचा मुलगा अविधेय याची कन्या असावी. हा अविधेय सुमारे सन ४४० ते ४५५ या काळात होऊन गेला.

नरेंद्रसेनाने आपल्या राज्याच्या पूर्व व उत्तर दिशांस आक्रमक धोरण अवलंबिले होते असे दिसते. त्याचा मुलगा द्वितीय पृथ्विषेण याच्या बालाघाट ताम्रपटात नरेंद्रसेनाने शौर्याने आपल्या शत्रूंचा पराभव केला होता व कोसला, मेकला व मालव या देशांचे अधिपति त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानत होते, असे वर्णन आले आहे.[२०] यापैकी मालवदेश पश्चिम क्षत्रपांच्या उच्छेदापासून स्वत: गुप्तांच्या अमंलाखाली होता. ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हूणांच्या स्वाऱ्यामुळे गुप्त साम्राज्य खिळखिळे झाले तरीही स्कंदगुप्ताने मोठ्या शौर्याने त्यांच्या टोळ्यांच्या लाटा थोपूवन धरल्या होत्या तरी देशांत एकंदरीत अस्थैर्य व अशांतता यांचे वातावरण उत्पन्न झाले होते. याचे प्रमाण मन्दसोर येथील विक्रम संवत ५२९ च्या शिलालेखात सापडते.[२१] त्यात म्हटले आहे की विक्रम संवत ४९३ ते ५२९ यामधील ३६ वर्षाच्या अल्पावधीत दशपूर येथे कित्येक राजे होऊन गेले. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या विक्रमसंवत ५२४ च्या मंदसोर शिलालेखात म्हटले आहे की दशपुर ( मन्दसोर ) येथील गुप्तांचा मांडलिक प्रभाकर याला आपल्या स्वामीच्या अनेक शत्रूंशी लढावे लागले होते. यापैकी काहीनी वाकाटक नृपति नरेंद्रसेनाचे स्वामित्व स्वीकारुन गुप्तांचे जोखड टाकून देण्याचा प्रयत्न केला असावा.

नरेंद्रसेन गादीवर आला तेव्हा त्याचे बरेच वय झाले असावे ; कारण त्याचा पिता द्वितीय प्रवरसेन याने दीर्घकाळ राज्य केले होते. नरेंद्रसेनाची कारकीर्द वीस वर्षे चालून सन ४७० च्या सुमारास समाप्त झाली असावी. तिचा शेवट होण्यापूर्वी वाकाटक राज्यावर एक गंडांतर आले. नलवंशी भवदत्तवर्मा याने वाकाटकांच्या मुलाखावर स्वारी करुन त्याचा बराचसा भाग काबीज केला. नल राजे कोसला देशांत राज्य करीत होते असे पुराणे सांगतात. पुराणातील या विधानाला नलांच्या कोरीव लेखांच्या व नाण्यांच्या प्राप्तिस्थानावरुन दुजोरा मिळतो. वराह, भवदत्तवर्मा व अर्थपति या तीन नलराजांची सोन्याची नाणी मध्यप्रदेशात बस्तर जिल्ह्यातील कोंडेगाव तहसिलीत एडेंगा येथे सापडली होती.[२२] या राजांपैकी वराह हा सर्वात अगोदर आणि अर्थपति सर्वात नंतर राज्य करीत असावा. भवदत्तवर्म्याने वाकटकांच्या मुलखावर स्वारी करुन नन्दिवर्धन या त्यांच्या पूर्वीच्या

राजधानी पलीकडचाही प्रदेश काबीज केला. त्याचा एक ताम्रपट अमरावती जिल्ह्यात ऋद्धपूर येथे सापडला आहे.[२३] त्यामध्ये भवदत्तवर्म्याने यवतमाळ जिल्ह्यातील कदंबगिरिग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. भवदत्त वर्मा प्रयागला यात्रेच्या निमित्ताने गेला असता तेथे त्याने आपल्या व आपल्या राणीच्या पुण्योपार्जनाकरिता हे दान दिले होते. त्याचा ताम्रपट भवदत्तवर्म्याचा पुत्र अर्थपति याने नन्दिवर्धनाहून दिला आहे. या ताम्रपटातील स्थानोल्लेखावरुन वाकाटकांच्या जेष्ठ शाखेच्या अमंलाखाली बराचसा प्रदेश नलरांजानी जिंकला होता, हे स्पष्ट आहे. नरेंद्रसेन याने इ.स. ४४५ पासून इ.स. ४७० पर्यंत राज्य केले.

## दुसरा पृथ्वीसेन :

दुसरा पृथ्वीसेन हा नरेंद्रसेन याचा पुत्र होता. याच्या कारकीर्दीत नलराजा भवदत्त वर्माने वाकाटकाच्या राज्यांवर आक्रमण केले व विदर्भातील बराचसा भूभाग जिंकून घेतला होता. पृथ्वीसेन याने पुन्हा वाकाटकांच्या प्रतिष्ठेची पुनर्स्थापना केली. संरक्षणाच्या दृष्टीने पृथ्वीसेन याने आपली राजधानी पद्मपूर येथे नेली.[२४] ( भंडारा जिल्ह्यातील आमरगावजवळ ) पृथ्वीसेन याने नलराजावर आक्रमण करुन त्याला विदर्भातून हाकलून लावले. नलराजाची राजधानी पुष्करी ची नासधूस केली. याने उत्तरेकडे साम्राज्याचा विस्तार केला. हा विष्णूपासक असून याचा मृत्यू इ.स. ४९० मध्ये झाला. त्याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मृत्यूनंतर वाकाटकांची मुख्य शाखा समाप्त झाली आणि वत्सगुल्म शाखेने वाकाटकाच्या मुख्य शाखेचे राज्य जिंकून घेतले. नल राजावर मिळविलेल्या विजयानंतर राजधानी पद्मपूर या नगरास महत्व आले. येथे विद्वान ब्राम्हण व संस्कृत कविंचे वास्तव्य राहिले. द्वितीय पृथ्वीसेनाने उत्तरेतहि आपली सत्ता दृढ केली व मेकला देशाच्या उत्तरेच्या चेदि देशापर्यंत आपले साम्राज्य वाढविले. त्याचा मांडलिक व्याध्रदेव याचे दोन शिलालेख विंध्यप्रदेशात नचना[२५] व गंज[२६] येथे सापडले आहेत. हा व्याघ्रदेव उच्चकल्पवंशी असावा. कारण या राजवंशाचे कित्येक ताम्रपट त्या प्रदेशात सापडले आहेत, त्यामध्ये व्याघ्रनामक राजाचा उल्लेख आहे. या व्याघ्राचा पुत्र जयनाथ हा सुमारे गुप्त संवत १७० ते १९० ( इ.स. ४९० ते ५१० ) या कालांत राज्य करीत होता. तेव्हा त्याचा पिता व्याध्र ह्याचा काळ गुप्त संवत १५० ते १७० (इ.स. ४७० ते ४९०) हा येतो. याच काळात द्वितीय पृथ्विषेण राज्य करीत असल्यामुळे हा उच्च कल्पवंशी व्याध्रव त्या वाकाटक नृपतीचा

मांडलिक असावा, पांडववंशी राजांप्रमाणे उच्चकल्प राजेही प्रथम गुप्त सम्राटाचे मांडलिक होते, पण पुढे ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या अखेरीस गुप्तांची सत्ता निर्बल झाल्यावर त्यांनी वाकाटकांचे वर्चस्व मान्य केले असावे. वाकाटक राजे शिवोपासक होते. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय पृथ्वीसेन मात्र यास अपवाद होते. बालाघाट ताम्रपटात पृथ्वीसेनाचे वर्णन पदमभागवत म्हणजेच विष्णूचा उपासक असे केले आहे.[२७] नंदिवर्धन या शाखेत शूर, राज्यशासनकुशल, दानशील आणि साहित्य व शिल्पादि कला याचे उदार आश्रयदाते असे पुरुष उत्पन्न होऊन त्यांनी आपल्या घराण्याची कीर्ती पसरविली. त्यांनी बांधलेली देवालये आता विद्यमान नाहीत, पण रामटेक व पवनार येथे जे अवशेष सापडले आहेत त्यावरुन तत्कालीन शिल्पांची रमणीयता अजमावता येते.त्यांच्या काळी अनेक काव्ये निर्माण होऊन वैदर्भी रीतीला सर्वत्र मान्यता मिळाली. त्यापैकी दोनच काव्ये सध्या अवशिष्ट आहेत. एक कालिदासाचे संस्कृतांतील मेघदूत व दुसरे द्वितीय प्रवरसेनाचे महाराष्ट्री प्राकृतांतील सेतुबंध किंवा रावणवहो. दुसरा पृथ्वीसेन हा नंदिवर्धन या जेष्ठ शाखेचा शेवटचा राजा आहे. त्याच्यानंतर या जेष्ठ शाखेचे राज्य वत्सगुल्म शाखेने ताब्यात घेतले. दुसरा पृथ्वीसेन याने इ.स. ४७० पासून इ.स. ४९० पर्यंत राज्य केले आहे.

## वत्सगुल्म शाखा :

विदर्भात जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या वाशिम येथे इ.स. १९३९ मध्ये वाकाटक राजा द्वितीय विंध्यशक्ती याचा एक ताम्रपट मिळाला.[२८] या ताम्रपटावरुन तसेच अजिंठा लेणी क्र. १६ मधील वाकाटककालीन कोरीव लेखावरुन वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहीती प्राप्त झाली. अजिंठा कोरीव लेखात वत्सगुल्म वाकाटक राजवंशाची वंशावळ दिली आहे. पहिल्या प्रवरसेनचा कनिष्ठ पुत्र सर्वसेन हा वत्सगुल्म शाखेचा संस्थापक आहे.

## सर्वसेन ( इ.स. ३३० ते ३५५ ) :

पहिल्या प्रवरसेनाच्या चार मुलांत वाकाटक साम्राज्याची विभागणी करण्यात आली होती. प्रवरसेनाचा धाकटा पुत्र सर्वसेन याने या शाखेची स्थापना केली. याचे राज्य विंध्याद्री पर्वतापासून दक्षिणेत गोदावरी नदीपर्यंत पसरले होते. वत्सगुल्म ही ( वाशिम जिल्हा ) त्याची राजधानी होती. साम्राज्य विस्तारासाठी रवी या सचिवाने सर्वसेन यास फार सहकार्य केले. सर्वसेन स्वत:ला

धर्ममहाराज म्हणवून घेत असे.[२९] तो प्रसिध्द कवी होता. त्याने हरिविजय या नावाचे प्रकृत काव्य रचले. सर्वसेनानंतर त्याचा पुत्र विंध्यसेन राजा झाला. त्याने जवळपास ३७ वर्षे राज्य केले. याने धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती. याने कुंतल देशाचा पराभव केला असावा. याने दिलेल्या दानपत्रावरुन समजते की याचे राज्य नांदेड जिल्ह्यातील काही भूभागावर असावे. सर्वसेनाने आपल्या राजधानीकरिता वत्सगुल्म या प्राचीन पुण्यक्षेत्राची निवड केली हे वत्सगुल्म म्हणजे सध्याचे जिल्ह्याचे ठिकाण वाशीम होय. याच्या सभोवतालच्या प्रदेशाला वात्सगुल्मक असे म्हणत. याचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रात आला आहे. वत्सगुल्माची पवित्र क्षेत्र म्हणून ख्याती होती. वत्सगुल्ममहात्म्यात म्हटले आहे की त्या ठिकाणी वत्स नामक ऋषीने आपल्या आश्रमाजवळ देवांच्या गुल्मांची (म्हणजे समूहाची ) वस्ती करिवली होती म्हणून त्याला वत्सगुल्म हे नाव पडले.[३०] कामसूत्राच्या जयमंगला नामक टीकेत या स्थलनामाची दुसरीच व्युत्पत्ति दिली आहे. त्या टीकेत म्हटले आहे की वत्स व गुल्म हे सख्खे भाऊ असून दक्षिणापथाचे राजपुत्र होते. त्यांनी वसविलेल्या देशास वत्सगुल्म हे नाव पडले. वाकाटकांच्या राजवटीत वत्सगुल्म राजधानीची विद्या व संस्कृति याचे प्रमुख केंद्र म्हणून मोठी ख्याती झाली व तेथील उत्कृष्ट प्राकृत काव्यामुळे वच्छोमी रीति सर्वत्र मान्यता पावली. सर्वसेनांच्या राज्याचा प्रदेश उत्तरेस इंध्याद्रि पर्वतराजीपासून दक्षिणेस गोदावरी नदीपर्यंत पसरला होता. या प्रदेशावर आपले स्वामित्व प्रस्थापित करण्यामध्ये याला सोम नामक ब्राह्मणाला क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या रवि या सचिवाचे साहाय्य झाले होते.

या रवीचे वंशज वत्सगुल्मच्या वाकाटकांचे कित्येक पिढ्यांपर्यत मुख्य प्रधान झाले व त्यांची त्यांनी एकनिष्ठपणे सेवा केली. वाशिम ताम्रपटात वाकाटक राजांनी नंदीतटावरील अग्रहाराला एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. नंदीतट व नंदीतरु या स्वरुपाचा नांदेडचा इसवी सनाच्या ४ थ्या शतकातला पहिला उल्लेख म्हणजे वाकाटकाचे राज्य नांदेड पर्यंत होते याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. सर्वसेन याने इ्स. ३३० पासून इ.स. ३५५ पर्यंत राज्य केले.

## विंध्यसेन दुसरा ( इ.स. ३५५ - इ.स. ४०० ) :

सर्वसेन याच्यानंतर विंध्यसेन हा वत्सगुल्मचा राजा झाला. वाशिम ताम्रपटात याचा उल्लेख द्वितीय विंध्यशक्ती या नावाने केला आहे.[३१] याने कुंतल देशाचा पराभव केल्याचा उल्लेख

अजिंठा कोरीव लेंख्रात आहे. कुंतल देशात एक राष्ट्रकूट घराणे उदयास आले. त्याचा मूळ पुरुष मानाङ्क याने बहुधा प्रथम प्रवरसेनाच्या दुसऱ्या एका मुलाच्या ताब्यात असलेला गोदावरीच्या दक्षिणचा प्रदेश जिंकला व इतरही विजय संपादन केले. त्याच्या एका वंशजाच्या लेख्रात मानाङ्काचे समृध्द अशा कुन्तल देशाचा अधिपति आणि विदर्भ व अश्मक देशांचा विजेता असे वर्णन केले आहे. अश्मक देश गोदातीरी असून त्यात अहमदनगर व बीड जिल्ह्याचा अन्तर्भाव होत होता. अश्मकाधिपति वत्सगुल्मच्या वाकाटकांचा मांडलिक होता असे दिसते. मानाङ्.काचे आपल्या नावे मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली.[३२] हे मानपूर सातारा जिल्ह्यातील माण नदी काठचे सध्याचे माण गाव असावे. मानाङ्काच्या वंशजाचे काही ताम्रपट मुंबई भागात सापडले आहेत. त्यांच्या अक्षरवाटिकेवरुन मानाङ्क ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या अखेरच्या पादांत राज्य करीत असावा. तेव्हा तो विंध्यसेनाचा समकालीन होता असे दिसते. विंध्यसेन व मानाङ्क हे दोघेही परस्परांचा पराभव केल्याची बढाई मारतात. तेव्हा त्यापैकी कोणालाही पूर्ण विजय प्राप्त झाला नसावा. मानाङ्काचा पुत्र देवराज याच्या कारकीर्दीत हे कुन्तलांतील राष्ट्रकूट घराणे गुप्त सम्राट द्वितीय चन्द्रगुप्ताच्या राजनैतिक वर्चस्वाख्राली आले व त्यांचा कारभार चन्द्रगुप्ताच्या सल्ल्याप्रमाणे होऊ लागला.

विंध्यसेनाने वाशीम ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या ३७ व्या वर्षी वत्सगुल्म राजधानीहून दिला होता. त्यातील लेख्रात नान्दीकट विषयातील ( म्हणजे जिल्ह्यातील ) एक गाव दान दिल्याचा निर्देश आहे.[३३] हे नान्दीकट म्हणजे हैदराबाद संस्थानातील सध्याचे नांदेड होय. या ताम्रपटांतील लेख्राच्या आरंभीचा राजवंशप्रशस्तीपर भाग संस्कृतमध्ये असून नंतरचा दानविषयक भाग प्राकृतमध्ये आहे. यापूर्वीचे शिलालेख्र व ताम्रपट बहुधा प्राकृतध्येच लिहिले असत. तेव्हा या ताम्रपटावरुन वाकाटकांच्या काळी संस्कृत भाषा राजदरबारी हळू हळू कशी मान्यता पावू लागली, ते स्पष्ट दिसते. आपल्या दोन पूर्वजांप्रमाणे विन्ध्यसेनानेही धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती.[३४] घटोत्कच लेण्यातील लेख्रात त्याचा प्रधान प्रवर याचा उल्लेख्र आहे. म्हणजेच विंध्यसेन यांने मराठवाडयातील बीड, औरंगाबाद, नांदेड, दक्षिण गोदावरी , अजिंठा, घटोत्कच, प्रतिष्ठान त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील नगर, सातारा, नाशिक व पुणे या ठिकांणी - पुणे या ठिकाणी त्याने आपले साम्राज्य

पसरविले होते.[३४]विंध्यसेन  हा नन्दिवर्धनाच्या त्याने आपले साम्राज्य पसरविले होते.[३५] विंध्यसेन हा नन्दिवर्धनाच्या प्रथम पृथ्विषेणाचा समकालीन होता. विंध्यसेन याने इ.स.  ३५५ पासून इ.स. ४०० पर्यंत राज्य केले.

## प्रवरसेन दुसरा ( इ.स. ४०० ते इ.स. ४१५ ) :

विंध्यसेनानंतर त्याचा पुत्र व्दितीय प्रवरसेन हा गादीवर आला. पण त्याने अल्पकाळ राज्य केले ते फक्त १५ वर्ष. याच्या कारकीर्दीविषयी फारशी माहिती नाही. अजिपुत्राच्या कोरीव लेखात म्हटले आहे.[३६]  याने सुमारे ४०० ते ४१५ पर्यंत पंधरा वर्षेच राज्य केले असावे ;  त्याच्या मृत्यूसमयी त्याचे मुलाचे वय केवळ ८ वर्ष होते.[३७]

त्याचा सचिव श्रीराम हा होता. याचा उल्लेख घटोत्कच लेण्यामध्ये आलेला आहे हे स्पष्ट झाले. त्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये अनेक सुधारणा घडवून केलेल्या दिसून येतात.[३८]  त्याने अल्पकाळामध्ये वाकाटक साम्राज्य कमावले व त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हा देवसेन गादीवर आला.

### देवसेन - इ.स. ४५० ते ४७५ :-

वत्सगुल्मच्या गादीवर व्दित्तीय प्रवरसेन नंतर आलेल्या बालराजाचे नाव  अज्ञात आहे. अंजिठा कोरीव लेखात वत्सगुल्म शाखेची वंशावळ दिली आहे.[३९] परंतु प्रवरसेन नंतर सत्तेवर आलेल्या राजाचे नाव अस्पष्ट झाले आहे. त्याने उत्तम रितीने राज्य केल्याचाही उल्लेख अंजिठा लेखात आढळतो. घटोत्कच लेण्यातील लेखात त्याच्या सचिवाचे नाव कीर्ती  आढळते.[४०] यानंतर इ.स. ४५० मध्ये त्याचा पुत्र देवसेन सत्तेवर आला.  देवसेन याने जवळजवळ २५ वर्ष राज्य केले. देवसेन हा इ.स. ४५० मध्ये गादीवर आला. याच्याविषयीची माहिती अजिंठा लेणी व घटोत्कच लेण्यांमध्ये असलेली दिसून येते. तसेच देवसेनचा इंडिया ऑफिस हा एक ताम्रपट सापडला आहे. डॉ. रॅन्डल याने त्याचा पूर्ण अभ्यास केला व त्याविषयीची माहिती प्रसिध्द केली.[४१]

त्यात देवसेनची संपुर्ण माहिती मिळते तसेच देवसेनने दिलेल्या दानविषयीचीही संपुर्ण माहिती मिळते. उदा . तांड गटकरकाच्या उत्तर मार्गावरील - सुध्दा राज्य केले या विषयीची पुरावा दिलेला आहे. यावरुन स्पष्ट होते की, इतर प्रदेशांबरोबर प्रवरसेनने मराठवाडा या भागावर आपले

वर्चस्व निर्माण केले होते. त्याच्या शासनातील राजसेकव हस्तीभोज नावाच्या अत्यंत दक्ष व विनीत या अधिकाऱ्याचा उल्लेख्र केल्याचा दिसून येतो. त्याने आपल्या कारकर्दीमध्ये शांतता व सुबत्ता निर्माण केली होती. त्याचे वर्चस्व इतर मांडलिक राजांनी मान्य केले होते. देवसेनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हरिषेण हा गादीवर आला.

**६) हरिषेण - इ.स. ४७५ ते ५१० :-**

देवसेननंतर त्याचा मुलगा हरिषेण हा इ.स. ४७५ मध्ये गादीवर आला. त्याने जवळ जवळ ६० वर्षेपर्यंत राज्य केले. याची कारकीर्द सर्वात जास्त होती. वाकाटक घराण्यातला हा शेवटचा ज्ञात राजा होता. त्याने आपल्या पराक्रमाने आपले साम्राज्य
चारीही दिशांना पसरविले होते. याची राजधानी वत्सगुल्म ही होती.

तेथून त्याने आपल्या पूर्वजाप्रमाणेच आपल्या साम्राज्याचा विस्तार चारीही दिशांना केला. त्याने जिंकलेल्या साम्राज्याचे व विजयाचे वर्णन मराठवाडयातील अजिंठा लेणीमधील १६ व्या क्रमांकाच्या सापडलेल्या शिलालेख्रावरुन दिसून येते.[४०] त्याने चारही दिशांना विजय मिळविला व आपल्या साम्राज्याच्या विस्तार केलेला दिसून येते. उत्तरेस आवंती (माळवा), पूर्वेस-कोसल (छत्तीसगढचा प्रदेश), कलिंग (ओरिसाचा भाग), आंध्र प्रदेशाच्या पश्चिमेस लाट (मध्य व दक्षिण गुजरात), त्रैकूट (नाशिक जिल्हा आणि दक्षिणेस कुंतल, (दक्षिण महाराष्ट्र), उत्तरेस आवंती (माळवा) पासून तर दक्षिणेस कुंतल देश, दक्षिण महाराष्ट्र पूर्व आणि पश्चिमेस- अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंतच्या प्रदेशावर हरिषेणने आपली सत्ता प्रस्थापित केली होती. इतर काही प्रदेशांवरसुध्दा त्याने आपले वर्चस्व निर्माण केले. बाकीच्या राज्यांनी हरिषेणचे मांडलिकत्व स्वीकारले.

उदा . पश्चिमेकडील ऋषिक ख्रानदेशचा राजा हा हरिषेणचा मांडिलक होता. याचा उल्लेख्र मराठवाडयातील अजिंठयाच्या सतराव्या क्रमांकाच्या लेणीत केला आहे. [४४] तसेच महाराष्ट्रातील काही प्रांतांवर हरिषेणेचे वर्चस्व होते. त्यामध्ये कोल्हापूर, मुंबई, नाशिक, ख्रानदेश होते. त्याचप्रमाणे मराठवाडा विभागातील बीड, अजिंठा, नांदेड, घटोत्कचं, गुलवाडा, औरंगाबाद, प्रतिष्ठान व इतर जवळजवळ संपूर्ण मराठवाडावर हरिषेणचे वर्चस्व होते हे स्पष्ट झाले आहे. [४५]

हरिषेणचा सचिव वराहदेव हा होता.[४६] वराहदेव हा बौध्द धर्माचा उपासक होता. वराहदेवाने आपल्या कारकीर्दीत म्हणजेच हरिषेणच्या कारकीर्दीत मराठवाडयातील अजिंठा लेणी क्रमांक १६ कोरविली व त्यात त्याने शिलालेख कोरविला. या शिलालेखात त्याने संपूर्ण वत्सगुल्म वाकाटक शाखेची माहिती दिलेली दिसून येते. यात त्याने हरिषेणच्या साम्राज्याचा उल्लेख केल्याचा दिसून येते. त्याप्रमाणे त्याने अजिंठयापासून १० मैलांवर गुलवाडा टेकडीत घटोत्कच लेणी खोदून त्याने आपल्या वंशाचा संपूर्ण उल्लेख केला आहे.या लेण्यावरुन असे स्पष्ट होते की, संपूर्ण मराठवाडयावर हरिषेणने आपले वर्चस्व निर्माण केले होते. तसेच त्याने आपल्या पराक्रमाने चारही दिशांमध्ये आपले साम्राज्य पसरविले होते. हरिषेणची कारकीर्द इ. ४७५ ते इ.स. ५१० होती.
हरिषेण वाकाटकांचा महत्वाचा राजा ठरला आहे.[४७] अमेरिकन लेखक डॉ. स्पिंक व बेगले यांनी मराठवाडयातील संपूर्ण अजिंठा लेण्यांचा अभ्यास केला व विशेषत: लेणी क्र. १,२,५,१२,१४,१५,१६,१७ यामध्ये संपूर्ण अभ्यास करुन असे स्पष्ट मत मांडले आहे की, या सर्व लेण्या वाकाटककालीन होत्या. या लेण्यांमधील दिलेल्या माहितीवरुन त्यांनी स्पष्ट केले आहे की, हरिषेण या वाकाटक राजाने संपूर्ण मराठवाडयावर आपले वर्चस्व निर्माण केले होते असे दिसून येते.[४८]

हरिषेणनंतर एक -दोन राजे झाले असावेत. पण त्यांची माहिती उपलब्ध होत नाही. इ.स. ५५० च्या सुमारास वाकाटकांचे राज्य नष्ट झाले असावे. वाकाटकांच्या प्रदेशावर नल, कलचुरी, चालुक्य आणि कदंब  वंशाने सत्ता प्रस्थापित केली व वाकाटक राजवंश काळाच्या पडद्याआड गेला.[४९] हरिषेणनंतर वाकाटक सत्तेचा अस्त कसा झाला याचा अधिकृत पुरावा किंवा इतिहास उपलब्ध नाही. वाकाटकांच्या अस्तानंतर १००-१२५ वर्षांनी दण्डी यांनी लिहिलेल्या ‘दशकुमारचरित’ यात ८ व्या उच्छवासांत जी कथा आली आहे त्यावरुन वाकाटकांच्या ऱ्हासाची प्रक्रिया काही प्रमाणात लक्षात येते.[५०] दण्डीच्या कथेवरुन असे स्पष्ट दिसते की, उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत पसरलेले विशाल साम्राज्य हरिषेणाच्या पुत्राच्या आणि सामंताच्या फितुरीमुळे एकाएकी कोलमडून पडले. अशा प्रकारे ३०० वर्षाची उज्ज्वल राजकीय परंपरा व वैभवशाली असा सांस्कृतिक वारसा असणारे वाकाटकांचे राज्य ५५० च्या सुमारास नामशेष झाले.

गुप्त राजवंश व वाकाटक राजवंश हे समकालीन होते. गुप्त राजवंशाने उत्तर भारतात तर वाकाटक राजवंशाने दक्षिण भारतात राज्य केले.प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासातील या उज्ज्वल कालखंडाविषयी अनेक मान्यवर विद्वानांनी संशोधनपर लेखन केले आहे. वाकाटकांच्या दोन्ही शाखेच्या काळात या राजवंशाचा मराठवाडा विभागाशी अतिशय जवळचा संबंध होता. मराठवाडा विभागातील अंजिठा येथील काही लेणी या राजवंशाच्या काळात निर्माण झाल्यामुळे त्यांचे नाव सर्व जगात सुप्रसिध्द झाले आहे. वाकाटक नृपतींचा कालानुक्रम पुढील प्रमाणे.[५१]

## वाकाटक नृपतींचा कालानुक्रम

प्रथम विंध्यशक्ती
(सन २५० ते २७०)

प्रथम प्रवरसेन
(सन २७० ते ३३०)

**जेष्ठ शाखा**

गौतमीपुत्र

प्रथम रुद्रसेन
(सन ३३० ते ३५०)

प्रथम पृथ्वीषेण
(सन ३५० ते ४००)

द्वितीय रुद्रसेन
(सन ४०० ते ४०५)

दिवाकर सेन
(सन ४०५ ते ४२०)

दामोदर सेन
उर्फ
द्वितीय प्रवरसेन
(सन ४२० ते ४५०)

नरेन्द्रसेन
(सन ४५० ते ४७०)

द्वितीय पृथ्वीषेण
(सन ४७० ते ४९०)

**वत्सगुल्म शाखा**

सर्वसेन
(सन ३३० ते ३५५)

द्वितीय विंध्यशक्ति
(सन ३५५ ते ४००)

द्वितीय प्रवरसेन
(सन ४०० ते ४१०)

पुत्र
(नाम अज्ञात)

(सन ४१० ते ४५०)

देवसेन
(सन ४५० ते ४७५)

हरिषेण (सन ४७५ ते ५००)

पुत्र
(नाम अज्ञात)
(सन ५०० ते ५१०)

## २.४ वाकाटकांचे योगदान :

भारतीय इतिहास आणि संस्कृतीला वाकाटक राजवंशाने फार मोठे योगदान दिले आहे. वाकाटकांचे साम्राज्य विशाल होते. प्रशासनाच्या सोयीसाठी या विशाल साम्राज्याचे विभाजन राज्य आणि राज्याचे विभाजन विषय यामध्ये केले होते.[५२] विषयाचे पुन्हा आर भोग ( भुक्ती ) हे उपविभाग होते. मार्ग हा विभाग भक्तीपेक्षा मोठा आणि विषयापेक्षा लहान होता. साम्राज्याचा सर्वाधिपती राजा असे. धर्मशास्त्रातील नियामानुसार राजे राज्य करत असत. वाकाटकांच्या लेखामध्ये मंत्रिपरिषदेचा उल्लेख सापडत नाही. वाकाटककालीन राज्यशासनात ब्राह्मण उच्च पदावर असले तरी क्षेत्रीय सुध्दा शासकीय पदांवर नियुक्त केलेले होते. त्यांच्या दानपत्रात क्षत्रीय नावांचा ब्राह्मण नावापेक्षा अधिक उल्लेख आढळतो.[५३] प्रशासन व्यवस्थेमध्ये राजा हा मुख्य घटक होता. राजपद हे अनुवंशिक दिसून येते, वाकाटक राजे आपल्या साम्राज्याची जबाबदारी राजपुत्रावर सोपवत असत.

प्रवरसेन प्रथम याने आपले साम्राज्य चार मुलामध्ये विभागले. ज्यानी पुढे प्रवरसेनच्या मृत्यूनंतर स्वतंत्र राज्य प्रस्थापित केले.[५४] वाकाटकांनी विशाल साम्राज्याची स्थापना केली. या साम्राज्यामध्ये राजाच्या मृत्यूनंतर राजपुत्र अज्ञानी असले तर राज्याचा कारभार महाराणी पहात असे. राजपुत्राला शिक्षण साहित्य, प्रशासन, ज्ञान दिले जात होते. शिक्षणाबरोबरच विशेष करुन सैनिकी प्रशिक्षण दिले जात असावे.[५५] वाकाटकाच्या लेखांत मंत्री परिषदेचा कोठेही उल्लेख नाही.[५६] द्वित्तीय रुद्रसेन याची पत्नी प्रभावती गुप्ता व नरेंद्रसेनची पत्नी अज्झित भट्टरिका या दोन राण्यांचा अपवाद वगळता इतर राण्यांनी राज्यकारभारात भाग घेतला असे दिसत नाही. देशाचे राष्ट्र किंवा राज्य या नावांचे मोठे विभाग होते. त्यांचा कारभार पाहण्यासाठी ‘चट,’ ‘भट,’ ‘पुलिस’ आणि ‘सेना’ असे अधिकारी होते.[५७] जमीन महसुल, राज्याचे इतर कर वसुल करणे उघडकीस आलेले भूमिगत द्रव्य जप्त करणे, मिठाच्या इतर खाणी चालविण्याची व्यवस्था - करण्याचा व राज्याचा कामाकरिता वेठबिगार धरण्याचा वरिल अधिकाऱ्यांना हक्क असे. वाकाटक राजे स्वत:ला धर्ममहाराज म्हणून घेत असत. वाकाटकांनी आपल्या मांडलिक राजांना अंतर्गत स्वायत्तता बहाल केली होती. मांडलिक राजांच्या ताम्रपटात वाकाटकांचा उल्लेख सापडत नाही. यावरुन वरील अंदाज करता येतो. वार्षिक

कर देणे आणि आदेश येईल तेव्हा ससैन्य वाकाटकांना मदत करणे ही बंधने मांडलिक राजांवर होती. राष्ट्र किंवा राज्य यावरील प्रमुखास राज्याधिकृत म्हणत असत. सचिवालयाच्या प्रमुखास सर्वाध्यक्ष म्हणत असत आणि सर्वाध्यक्षाच्या सहकाऱ्यास कुलपुत्र या नावाने ओळखले जात असे. राज्यात शांतता आणि सुव्यवस्था ठेवण्याचे काम सैनिक आणि पोलिस यांचे होते. पोलिस अधिकाऱ्यास दंडनायक म्हणत असत तर मुख्य लष्करी अधिकाऱ्यास सेनापती म्हणत असत. गावचा प्रमुख ग्रामकुट किंवा ग्रामणी हा अधिकारी असे.

राज्यांचे मुख्य उत्पन्न जमीन महसूल व प्रत्यक्ष कर यापासून होत असले पाहिजे. त्यांना 'क्लृप्त' व 'उपक्लृप्त' अशा संज्ञा ताम्रपटात लावल्या आहेत. क्लृप्त किंवा निश्चित कर याचा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आला आहे.[५८] ज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे भूमीकर होय. राज्याचा गुप्त धनावरसुध्दा अधिकार असे. किरकोळ करांना पुष्पक्षीरसन्दोह नावाने ओळखले जात असे.[५९] वाकाटकांच्या काळात एका ताम्रपटात 'रजुक' नावाचा उल्लेख आलेला आहे.[६०] 'रजुक' हा शब्द 'रज्जू' दोरी, यापासून बनला आहे. कदाचित हा अधिकारी जमीनीचे मोजमाप करुन त्यावरील सारा ठरविण्याचे काम करीत असावा.गावांत पशूच्या विक्रीने प्राप्त झालेल्या धनावर तसेच इतर रीतीने मिळालेल्या रोख पैशांवर हल्लीच्या प्राप्ती करासारखा हा शेकडा २ टक्के कर दयावा लागत असे. याशिवाय गुप्त धन किंवा निक्षेप उघडकीस आल्यावर त्याच्यावर राजाचा हक्क असे. मिठाच्या खाणीचे उत्पन्न सरकारच्या मालकीचे असे. दारु गाळण्याचा अधिकार राजाकडे असे.[६१] पुष्पक्षीरसन्दोह याशिवाय अनेक किरकोळ कर असत. हे कर ग्रामाधिकारी वसुल करी. सार्वजनीक कामाकरीता लोकांना वेठीने कामास लावण्याचा अधिकार राजाकडे असे. राजाचे अधिकारी व शिपाई दौऱ्यावर असत तेव्हा त्यांच्या घोडयांना व बैलांना वैरण पुरविणे, त्यांच्या आसनाकरीता चामडी देणे, त्यांच्या सैपाकाकरीता जळणाची तजवीज करणे याबद्दल गावकरी लोक जबाबदार असत.

वाकाटकांचे राज्यशासन कार्यक्षम असून त्यायोगे प्रजाजनांस समृध्दी, शांतता व सुव्यवस्था यांचा लाभ झाला होता, असे दिसते. वाकाटकांनी देशाचा राज्यकारभार न्यायाने चालविला व आपल्या गुणांनी, पुण्योपार्जनाने आणि कीर्तीने स्वत:स उज्जवल केले. मी माझ्या

अभ्यासातून या प्रबंधात स्पष्ट करु इच्छितो की, बहुतांश वाकाटक नृपतींचा मराठवाडयाशी संबंध आला होता. उपलब्ध पुराव्यावरुन स्पष्ट करु इच्छितो की, मराठवाडयातील अजिंठा लेणी, त्यातील शिलालेख, त्यात स्पष्ट केलेली वाकाटकांचे राजवंश तसेच त्यांच्या साम्राज्यविस्ताराविषयीची संपूर्ण माहिती मिळते. तसेच वाकाटक राजांनी मराठवाडयातील काही गावे ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख प्रभावती गुप्ता हिच्या पुणे ताम्रपटात मराठवाडयातील प्रतिष्ठान या ठिकाणी ब्राह्मणांना दिलेले आहे. तिने या नगरीला आषाढी एकादशीच्या दिवशी ब्राह्मणांना दिलेले दान हे पुन्हा ताम्रपटात स्पष्ट केले आहे. म्हणजेच तिने मराठवाडा या भागाला भेट दिली होती. मराठवाडा या प्रदेशावर तिने आपले वर्चस्व निर्माण केलेले दिसून येते. तसेच विंध्यशक्ती दुसरा याने मराठवाडयातील गोदावरी किनाऱ्यावरील प्रदेश जिंकला होता. त्याने नांदेडपासून ४० ते ४५ मैलांवर असलेले टाकळी व मोहन टाकळी ही गावे ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख मिळतो.

# संदर्भ सूची


१. Epigraphia Indica Vol-XXVI, Delhi, p. १३७.

२. Ibid, Vol-XV, p. ३९.

३. डॉ. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर विश्वविद्यालय नागपूर, १९५७, पृ.२४.

४. कित्ता, पृ.१४-२१.

५. कित्ता, प्रास्ताविक पृ.२.

६. Dhavlikar Madhukar, Ajanta, A Cultural study, Poona, University of Pune, १९७३, p. ११२.

७. Sastri Nilakanta, History of south India, Delhi, Oxford University press, १९७६, p. १०८.

८. डॉ. मिराशी वा. वि., पूर्वोक्त, पृ.३१.

९. कित्ता, पृ.३२.

१०. E.I., Vol-XXVI, Delhi, p. १३७.

११. डॉ. मिराशी वा.वि., पृ.३९.

१२. Indian Antiauary, Vol XXXXI, Delhi, १९१३, p. २१५.

१३. याजदानी गुलाम ( संपा. ), दख्खन का प्राचीन इतिहाय, दिल्ली, दी मॅकमिलन कंपनी ग्राफ इंडिया लि-१९७७, पृ.१६५.

१४. डॉ. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.४४.

१५. व्ही.व्ही. मिराशी, वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ.४१

१६. Indian Antiauary, Vol XXXXI, Delhi, 1913, p. 215.

१७. मोरवंचीकर,रा.श्री. दक्षिण काशी पैठण, पृ. ३०

१८. याजदानी गुलाम ( संपा. ), दख्खन का प्राचीन इतिहाय,१९७७, पृ.१६५.

१९. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.४४.

२०. Epigraphia Indiaca, Vol-IX, p. 267.

२१. Corps Inscriptions Indicaram Vol-III, p. 79.

२२. मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, १९५४, पृ. ५९.

२३. Epigraphia Indica, Vol-XXIX, p. 100.

२४. Yazdami Gulam M. ( Edi.), the Early History of the Deccan, Vol - I, 1960, p.6.

२५. Archaeological Survey of India -A report -Vol 221, 1883-84, p. 97.

२६. Epigraphia Indica - Vol - XVII, p. 12.

२७. Epigraphia Indica - Vol - IX, p. 267

२८. Ibid. P- 137

२९. याजदानी गुलाम (संपा.), पूर्वोक्त, पृ. १६६.

३०. मिराशी वा.वि., वा.न. आणि त्यांचा काल ; पूर्वोक्त, पृ. ५५.

३१. E.I., Vol -XXVI, p. 137.

३२. मिराशी वा.वि. पूर्वोक्त, पृ. ५७.

३३. E.I., Vol -XXVI, p. 137.

३४. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ. ५७.

३५. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन, -१९६०, पृ. १८६.

३६. Archaeological survery of western India- Vol -IV, 1883, p. 124 Plate 67.

३७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर, पृ. ५८.

३८. शां.भा.देव, महाराष्ट्र व गोवे शिलालेख, पृ.१३९.

३९. कित्ता.

४०. कित्ता.

४१. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ द डेक्कन, १९६०, पृ. १८७.

४२. रॅन्डल, द न्यू इंडियन ॲटिक्युटी, पृ. २ मध्ये प्रसिध्द केला.

४३. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ (देवसेनाचा इंडिया ऑफिस ताम्रपट), पृ.३३८,३३९.

४४. देव शां. भा. , महाराष्ट्र व गोवे शिलालेख सूची.

४५. इन्स्टिटयूट क्र. ६३, अंपगलेख, पृ. २४,२५, उपरोक्त लेख क्र. ६६, पृ. २६.

४६. Archaelogical survery of westera India, p. 138.

४७. मिराशी वा.वि., बुलेटिन ऑफ द डेक्कन कॉलेज, पृ. ८-४७.

४८. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ द डेक्कन इंडिया पार्ट १ ते ६, १९६०
पृ. १८८.६१. डॉ. स्पिंक व बेगले, अजिंठा आणि वाकाटक आर्ट, पृ. १८३.

४९. Tripathi R.S. Op. Cit.p.289.

५०. गाठाळ एस.एस. ,भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत) पृ. ३२४.

५१. मिराशी वा.वि.,वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, नागपूर, १९५७.पृ. १३.

५२. E.I. Vol. p. 137.

५३. जामखेडकर अ.प्र.,प्राचीन काळ, पृ. ४०.

५४. याजदानी जी.,दक्कन का प्राचीन इतिहास , पृ. १८०.

५५. 'इं० ऐ०'VII, पृ.३७.

५६. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ.६९.

५७. याजदानी जी., दक्कन का प्राचीन इतिहास , पृ. १८१.

५८. अर्थशास्त्र, पृ. ६०

५९.. साखरे विजया, पुर्वोक्त, पृ. १४३.

६०. 'ए० इं०'XXIV, P.56..

६१. मिराशी वा.वि. , वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, पृ. ७८